जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची पोलीस खात्याकडे प्रलंबित असलेली अपहारांची प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्र. झेडपीए १०८९/सीआर ५६५५/२९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक: १६ मे १९८९

## परिपत्रक

जिल्हा परिषदेच्या १९८८-८९ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात जिल्हा परिषदांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे पंचायत राज समितीने सचिव, ग्राम विकास विभाग यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी, जिल्हा परिषदेच्या ८८-८९ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील पंचायत समिती गंगापूर जिल्हा परिषद औरंगाबाद येथील अपहारांची प्रकरणे पोलीस खात्याकडे प्रलंबित असल्याचे समितीने शासनाच्या निदर्शनास आणले अशा प्रकारे जिल्हा परिषदांकडील अपहारांची जी प्रकरणे पोलीस खात्याकडे प्रलंबित असतील ती निकाली काढण्यासाठी अशी प्रकरणे पोलीस आयुक्त/अधिक्षक यांच्या निदर्शनास आणावीत असे गृह विभागाने या विभागास सुचविले आहे. गृह विभागाच्या वरील सुचनेच्या संदर्भात या विभागाने असा निर्णय घेतला आहे की, सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद व्यवहारातील अपहारांची/अव्यवहाराची जी प्रकरणे पोलीस खात्याकडे चौकशीसाठी ६ महिन्यापेक्षा जास्त काळ प्रलंबित असतील तर त्याचा आढावा घेऊन संबंधीत पोलीस आयुक्त/अधिक्षक यांच्या नजरेस आणावीत. तसेच अशा अपहारांच्या प्रकरणांचा दर तीन महिन्यांनी आढावा घेण्यात यावा, त्यामुळे प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यामध्ये होणारा विलंब टाळता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ह. वि. देसाई]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी
27 MAY 198
शाखा -

प्रति,
१] सर्व विभागीय आयुक्त,
२] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३] महालेखापाल, महाराष्ट्र १ [लेखा परिक्षा] मुंबई.
४] महालेखापाल, महाराष्ट्र २ [लेखा परिक्षा] नागपूर.
५] मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन नवी मुंबई.
६] उप मुख्य लेखा परिक्षक [वरिष्ठ] स्थानिक निधी लेखा, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
७] सर्व जिल्हाधिकारी/सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक.
८] सर्व मंत्रालयीन विभाग [वित्त व न्याय विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, कार्य विभाग सोडून]
९] संचालक, प्र. सं. व वि. केंद्र महाराष्ट्र पुणे.
१०] संचालक, ए. ग्रा. वि. सं. योजना कोकण भवन नवी मुंबई
११] ग्रा. वि. वि. तील सर्व अधिकारी व कार्यासने,
१२] निवड नस्ती का. प्र. २९